# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर **P.S.(ठाणे):** कोंढवा
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0800 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 14/10/2025 10:49

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 10/10/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 10/10/2025
**Time From (वेळेपासून):** 14:56 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:56 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 14/10/2025 **Time (वेळ):** 09:36 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 018
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 14/10/2025 09:36 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 0.01 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** कोंढवा पोलीस स्टेशनचे मुख्य,गेट पासुन पश्मिमेस 10 मीटर ,अंतरावर रोड वर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): निता चत्रभुज मिसाळ

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1979

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे,कोंढवा,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस उपअधीक्षक ,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे,बंडगार्डन,पुणे शहर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9822214414

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सोमनाथ बापु महारनवर | | | 1. कोंढवा पोलीस स्टेशन,,पुणे शहर ,कोंढवा,पुणे शहर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | युवराज कष्णा फरांदे पोलीस | | | 1. स्वप्नपुर्ती बंगला वदावन सोस, उरुळी देवाची ता हवेली जि पु, कोंढवा,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच मागणी रु.5,000/ | 5,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-) (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी जबाब दि.14/10/2025.

माझे नाव श्रीमती निता चत्रभुज मिसाळ, पोलीस उपअधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे मोबा.क्र. 9822214414

आज रोजी समक्ष हजर राहून फिर्यादी जबाब देतो की, आम्ही दि.10/10/2025 रोजी 17.45 वाजता ला.प्र.वि. कार्यालयात हजर असताना पोलीस उपअधीक्षक श्री गावडे यांनी आम्हाला त्यांचे कक्षात बोलावून सदर ठिकाणी हजर असलेले तक्रारदार श्री. रविंद्र रामलु गज्जे, वय 44 वर्षे, व्यवसाय – कारपेंटर, रा. सध्या ड्/दृ श्री. बबलु सुखदेव यादव, बुध्द विहाराजवळ, साईनगर, सुखसागर रोड, कोंढवा पुणे मो.क्र.9372440445 मुळ गाव :- सिरसीनगन्ना, ता.जि. सिध्दपेठ, राज्य – तेलंगणा यांची ओळख करून दिली व त्यांची लोकसेवकाविरुध्द लाच मागणीबाबत तक्रार असून ती घेवून त्याप्रमाणे पुढील कायदेशीर कारवाई करणेबाबत आदेशित केले व सदर कारवाईकामी सपोफौ बाटे, पोशि तावरे, चालक पोहवा तावरे व त्यांचेकडील शासकीय वाहन एमएच 12 युसी 4105 असे पथक मदतीकरीता दिले. तसेच यापुर्वीच गोपनिय कारवाईकरीता ला.प्र.वि. कार्यालयत हजर असलेले उपअधीक्षक भुमिअभिलेख हवेली कार्यालयाकडील भुकरमापक श्री. रामेश्वर वामनराव आरू व श्री सुधीर रघुराव गाडेकर दोघे असे पंच साक्षीदार उपलब्ध करून दिले.

आम्ही, सापळा पथक, दोन्ही पंच साक्षीदार व तक्रारदार श्री गज्जे यांचेसह आमचे कक्षात आलो. आम्ही उपस्थित सर्वांची आपसात ओळख करून दिली. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना तक्रारदार श्री गज्जे यांची लोकसेवकाविरुध्द लाचेची मागणी होत असलेबाबत तक्रार असून त्या अनुषंगाने करण्यात येणा-या पडताळणी व सापळा कारवाईकामी आम्ही दोन्ही पंचासमक्ष तक्रारदार गज्जे यांना त्यांची तक्रार तोंडी कथन करण्यास सांगितली असता तक्रारदार श्री गज्जे यांनी त्यांची तक्रार तोंडी सांगितली. ती ऐकुन आम्ही तक्रारदार व पंच साक्षीदार यांना ला.प्र.वि. विभागाकडून करणेत येणा¬-या पुढील पडताळणी व सापळा कार्यवाहीबाबतची माहिती दिली. तसेच पुढील पडताळणी व सापळा कार्यवाहीकामी पंच क्र.1 म्हणून श्री रामेश्वर आरू व पंच क्र.2 म्हणून श्री सुधीर गाडेकर हे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना त्यांनी कथन केलेली तक्रार लिहून देण्यास सांगितले असता त्यांनी सांगितले की, त्यांना मराठी भाषा थोडीथोडी वाचता येते, समजते परंतू लिहीता येत नाही. त्यामुळे मी सांगतो त्याप्रमाणे माझी तक्रार टाईप करा अशी विनंती तक्रारदार गज्जे यांनी केल्यामुळे त्यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांची तक्रार पोशि तावरे यांनी संगणकावर मराठीत टंकलिखीत केली व त्यानंतर पिं्रट काढून ती तक्रारदार यांना वाचण्यास दिली. तक्रारदार यांनी त्यांची तक्रार दोन्ही पंचासमक्ष मोठयाने वाचून ती बरोबर असल्याची खात्री करून त्यावर सही केली. त्यानंतर दोन्ही पंचानी व आम्ही देखील त्यावर सहया केल्या. तक्रारदार श्री गज्जे यांची तक्रार पुढीलप्रमाणे होती-

"मी वरिलप्रमाणे अर्जदार असून मुळचा तेलंगना राज्यातील रहिवासी आहे. मी श्री बबलु सुखदेव यादव यांचे वरिल नमुद पत्यावर असलेल्या वर्कशॉपमध्ये कारपेंटरचा व्यवसाय करतो व त्याच ठिकाणी माझे कुटंुबासह भाडेतत्वार राहण्यास आहे. सदर ठिकाणी मी मंजुर असलेल्या विद्युत भारापेक्षा अतिरिक्त अनधिकृत विदयुतभारचा वापर केला/वीजेची चोरी केली म्हणून वर्कशॉप मालक बबुल यादव व भाडेकरून म्हणून माझ्याविरुध्द दि. 15/09/2025 रोजी महावितरण विभागाडून दिलेल्या फिर्यादीवरून कोंढवा पोलीस ठाणे येथे गु.र.नं. 644/2025 वीज नियामक कायदा कलम 135 अन्वये गुन्हा दाखल झाला. त्यानंतर सदर गुन्हयाचे अनुषंगाने कोंढवा पोलीस स्टेशनचे पोलीस

सोमनाथ महारनवर यांनी वर्कशॉप मालक यांना फोन करून त्यांना व मला दि.24/09/2025 रोजी कोंढवा पोलीस स्टेशन येथे बोलाविले व आम्हा दोघांना आमची नावे असलेली सदर गुन्हयातील बी.एन.एन.एस.कलम 35(3) अन्वयेची नोटीस दाखवली त्यावर जावक क्रमांक नव्हता व तपास अधिकारी म्हणून महिला पोलीस हवालदार ब.नं. 6177 श्रीमती सुषमा हिमगीरे यांचे नाव होते. त्याबाबत आम्ही पोलीस महारनवर यांना विचारले असता त्यांनी या गुन्हयाचे सर्व कामकाज मीच पाहतो असे आम्हाला सांगितले. पोलीस महारनवर यांनी सदर नोटीशीवर आम्हा दोघांच्या सहया घेतल्या परंतु नोटीशीची प्रत आम्हाला दिली नाही म्हणून मी त्या नोटीसीचा फोटो काढून घेतला. त्यावेळी पोलीस महारनवर यांनी मला बाजुला घेवून तुझ्या मालकाच नंतर बघतो परंतु मला भविष्यात या गुन्हयात अटक न करणे व मदत करण्यासाठी तपास अंमलदार पोहवा हिमगिरे यांना सांगतो त्यासाठी रु.10,000/- मला पोलीस महारनवर यांनी मागितले. सदरवेळी मी अटकेच्या भीतीने देतो असे त्यांना सांगितले व त्यानंतर मी व वर्कशॉप मालक तेथून निघुन आलो. दाखल गुन्हयासंदर्भात मी महावितरण कार्यालयाकडे नियमाप्रमाणे सर्व फाईन भरलेला आहे.

त्यानंतर दि.30/09/2025 रोजी मी माझे मुळ गावी जात असताना प्रवासामध्ये आमचे वर्कशॉप मालक बबलु यादव यांनी मला फोन करून सांगितले की, त्यांना सदर दिवशी पोलीस महारनवर यांनी कोंढवा पोलीस स्टेशन येथे बोलावून भविष्यात गुन्हयात अटक न करण्यासाठी व मदत करण्यासाठी रु.5000/- मागितले व यादव यांनी अटकेच्या भीतीपोटी नाईलाजाने त्यांना ते दिले. त्यानंतर मी माझे मुळ गावी निघुन गेलो व दिनांक 04/10/2025 रोजी परत आलो.

त्यानंतर देखील त्यांनी मला फोन करून माझ्याकडे पैशाचा तगादा लावला होता. परंतु मी गेलो नाही. आज दिनांक 10/10/2025 रोजी कोंढवा पोलीस ठाण्याचे पोलीस सोमनाथ महारनवर यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक 9689524887 वरुन माझा मोबाईल क्रमांक 9372440445 वर सुमारे 15.59 वा.फोन करुन, "काय रे, तु आला नाय, तुला काय मजाक वाटते का ? असे बोलून तुझ्या घरुन तुझ्या भावाला उचलून कोंढवा पोलीस स्टेशन ला आणले आहे. तु कसा येत नाही ते बघतो. दहा हजार नाही दिले तर तुला अटक करायला लावतो" असे बोलले व त्यानंतर देखील ते मला आतापर्यंत सारखा फोन करत आहेत.

कोंढवा पोलीस स्टेशनचे पोलीस सोमनाथ महारनवर हे मागणी करीत असलेले रुपये 10,000/- ही रक्कम कोणतीही शासकीय फी नसुन लाच रक्कम असल्याची माझी खात्री असून ते त्यांना देण्याची माझी इच्छा नाही. त्यामुळे मी तक्रार देण्यास आपल्या कार्यालयात आलो आहे. पोलीस महारनवर व माझेत यापुर्वीचे कोणतेही आर्थिक हितसंबंध व वैरभाव नाही.

तरी पोलीस सोमनाथ महारनवर यांचे विरुध्द आपल्या विभागामार्फत कायदेशीर कारवाई करावी ही विनंती."

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना लोकसेवक पोलीस महारनवर यांनी भेटण्यास कधी बोलावले आहे अशी विचारणा करता त्यांनी सांगितले की त्यांना लोकसेवक पोलीस महारनवर यांचा भेटण्यासाठी खुप वेळा फोन येवून गेला परंतु त्यांनी उचलला नाही. त्यामुळे आम्ही तक्रारदार, दोन्ही पंच साक्षीदार व सापळा पथकास पुढील पडताळणी कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या व आमचेकडील साहित्यामधुन शासकीय व्हाईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये नवीन सिलबंद पाकिटातील सॅनडिस्क कंपनीचे 32 जीबीचे मेमरीकार्ड घालून व्हॉईस रेकॉर्डरबाबत माहिती दिली. पंच व तक्रारदार यांचे पडताळणी निवेदन नोंद करणार तोच तक्रारदार यांचे 9372440445 या मोबाईल क्रमांकावर लोकसेवक महारनवर यांचा त्यांचे मोबा.क्र. 9689524887 फोन येवू लागला सदर कॉल रेकॉर्डवर घेणे आवश्यक असल्याने तक्रारदार यांनी तो घेतला नाही.

त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डर 18.52 वाजता चालू करून तो तक्रारदार यांचे समोर धरला असता तक्रारदार यांनी त्यांचे वरिल नमूद नंबरवरून लोकसेवक महारनवर यांचे नमूद नंबर फोन करून मोबाईलचा स्पीकर ऑन केला असता संपर्क झाला त्यावेळी लोकसेवक तक्रारदार यांना "आये क्या" असे बोलले असता तक्रारदार लोकसेवक यांना "साहब आ रहा हु थोडा गाडी पे था इसलिए आपका फोन देख नही पाया बहुत मिस कॉल आया" असे बोलले त्यावर लोकसेवक यांनी "कितना टाईम लगेगा" असे विचारले असता तक्रारदार यांनी "आधा पाऊना घंटा लगेगा साहब" असे बोलले त्यावर लोकसेवक "मेरे को टाईम नही मै उनको (तक्रारदार यांचे भावास ) अरेस्ट करता हु" असे बोलले त्यावर तक्रारदार यांनी "आता हू साहब" असे बोलून फोन कट केला असता आम्ही व्हॉईस रेकॉर्डर बंद केला. त्यानंतर आम्ही पुन्हा 19.11 वाजता व्हॉईस रेकॉर्डर चालु करून त्यामध्ये तक्रारदार, पंच क्र.1 श्री.आरु व पंच क्र.2 श्री गाडेकर यांची पडताळणी निवेदन ध्वनिमुद्रीत केली व तक्रारदार व पंच क्र.1 यांना कोंढवा पोलीस ठाणे येथे तक्रारदार यांचे दुचाकी वाहन क्र.एमएच 04 सीवाय 4563 ने जातील असे ठरविण्यात आले. त्यानंतर 19.28 वाजता आम्ही व्हॉईस रेकॉर्डर पुन्हा चालू करून तो पोशि तावरे यांचे मदतीने तक्रारदार श्री गज्जे यांनी शर्टचे आतील बाजुस बनियानला सेफ्टीपिनचे सहाय्याने लावला व तक्रारदार यांना पंच क्र.1 यांचे सोबत तक्रारदार यांचे

दुचाकीने कोंढवा पोलीस ठाणे येथे रवाना केले. तसेच आम्ही सापळा पथक व पंच क्र.2 यांचेसह शासकीय वाहन क्र. एमएच 12 युसी 4105 ने त्यांचे पाठोपाठ रवाना होवून कोंढवा परिसरामतील विजय सेल्स इमारतीचे विरुध्द बाजुस असलेल्या सीएसबी बँक येथे सुमारे 20.07 वा. पोहचलो. आम्ही पंच क्र.1 यांचे मोबाईलवर आम्ही थांबलेल्या ठिकाणचे लोकेशन पाठवून माहीती दिली. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच क्र.1 असे कोंढवा पोलीस स्टेशन येथून लोकसेवक महारनवर यांची भेट घेवून आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी पोशि तावरे यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढला व तो आम्ही बंद केला. तक्रारदार व पंच क्र. 1 यांना शासकीय वाहनात बसवून आम्ही पंच क्र.1 यांना ते व तक्रारदार असे पडताळणी करीता रवाना झालेपासून ते परत येईपर्यंतची हकिकत विचारली असता पंच क्र.1 यांनी पंच क्र.2 यांचे समक्ष सांगितले की, ते व तक्रारदार असे तक्रारदार यांचे दुचाकी वाहनाने कोंढवा पोलीस ठाणे येथे गेले. तक्रारदार यांनी त्यांचा मोबाईलवरून लोकसेवक यांचे मोबाईलवर फोन करून ते कुठे आहेत याबाबत विचारणा केली असता लोकसेवक यांनी तक्रारदार यांना पोलीस स्टेशच्या आतमध्ये येण्यास सांगितले त्याप्रमाणे तक्रारदार यांनी त्यांचे वाहन पार्क करून आम्ही दोघे पोलीस स्टेशनचे मुख्य गेटमधून आत गेला समोर कोंढवा पोलीस ठाणे असा मोठा बोर्ड लिहलेला होता. त्यांचे खाली पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांच कक्ष होता त्याचे डाव्या बाजुस असलेल्या लोखंडी जिन्याने आम्ही लोकसेवक बसत असलेल्या कक्षामध्ये गेलो. समोर एक गणवेश धारी पोलीस पोलीस बसलेले होते त्यांची नेमप्लेट पाहिले असता त्यावर सोमनाथ बापु महारनवर असे नाव छापलेले होते. यावरून ते लोकसेवक महारनवर असल्याचे मला समजले. त्यांनी तक्रारदार यांना कुठे होता असे विचारले त्यावर तक्रारदार यांनी साईटवर होतो असे सांगितले.

त्यानंतर लोकसेवक यांनी माझ्याबाबत तक्रारदार यांना विचारणा केली असता तक्रारदार यांनी मित्र असल्याचे सांगितले. त्यानंतर लोकसेवक यांनी तक्रारदार यांना त्यांचे फोटो बाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी तो सोबत आणला नसल्याचे सांगितले. त्यावर लोकसेवक यांनी तुमच्याकडे काय आहे असे विचारले असता तक्रारदार यांनी ड्रायव्हींग लायसन्स असल्याचे सांगितले. त्यावर लोकसेवक यांनी तक्रारदार यांचे पत्त्याबाबत विचारण केली व त्यांचा फॉर्म व माहिती भरुन घेण्यास सुरुवात केली. त्यानंतर लोकसेवक यांनी माझ नाव, वय, मोबाईल नंबर इत्यादीबाबत विचारणा केली त्याप्रमाणे मी त्यांना माहिती दिली. त्यानंतर लोकसेवक यांनी तक्रारदार यांची चेहरेपट्टी, भाषा, व्यसन, शिक्षण याप्रमाणे माहिती घेतली व भरुन घेतलेल्या फॉर्मवर तक्रारदार यांची सही घेतली. त्यानंतर तक्रारदार व लोकसेवक यांचेत तक्रारदार यांचे विरुध्द दाखल गुन्हयाचे अनुषंगाने चर्चा होवून तक्रारदार यांनी त्यांचे स्वत:चे फोटो व आधार कार्ड सोबत आणले नसल्याने ते घेवून उदया दि.11/10/2025 रोजी सकाळी 11.00 वाजता कोंढवा पोलीस ठाणेस या असे सांगितले. त्यामुळे मी व तक्रारदार असे आपण थांबलेल्या ठिकाणी परत आलो. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना घडलेल्या हकिकतेबाबत विचारणा केली असता त्यांनी पंच क्र.1 यांचेप्रमाणे मिळती जुळती हकिकत सांगितली. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करून ऐकले असता ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरे असलेबाबतची खात्री केली. एकंदरीत लोकसेवक तक्रारदार यांचेत झालेल्या चर्चे दरम्यान लोकसेवक यांचेकडून लाचेची मागणी झाली नाही परंतु तक्रारदार यांनी फोटो व आधारकार्ड सोबत आणले नसल्याने त्यांना लोकसेवक यांनी दि. 11/10/2025 रोजी बोलाविले असल्याने आम्ही सर्वांना गोपनियतेच्या सुचना दिल्या व दि.10/10/2025 रोजीची पडताळणी कारवाई स्थगित करणेत आली.

त्यानंतर आम्ही दिलेल्या सुचनेप्रमाणे दि.11/10/2025 रोजी दोन्ही पंच साक्षीदार व सापळा पथक असे सकाळी 10.30 वाजता ला.प्र.वि. पुणे कार्यालय येथे हजर झाले. त्यानंतर आम्ही सापळा कारवाईकामी आवश्यक असलेल्या साहित्यासह ला.प्र.वि. पुणे कार्यालयातुन 11.08 वाजता शासकीय वाहन क्र.एमएच 12 युसी 4105 ने रवाना होवून लुल्लानगर कोंढवा ब्रि◌ाजचे खाली पोहचलो त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना फोन करून कळविले असता त्यांनी आमचे मोबाईलवर ते थांबलेल्या ठिकाणचे लोकेशन पाठविले सदर लोकेशनप्रमाणे आम्ही तक्रारदार थांबलेले डीएसके गार्डन एन्क्लेव्ह, को.ऑप.हौसिंग सोसा. कोंढवा खुर्द येथील अंतर्गत रोडलगत या ठिकाणी 12.11 वाजता पोहचलो. सदर ठिकाणी तक्रारदार हे त्यांचे दुचाकी वाहन क्र.एमएच 04 सीवाय 4563 सह हजर होते. आम्ही तक्रारदार यांना शासकीय वाहनात बसविले. सदर ठिकाणावरून पुढील पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार, पंच साक्षीदार व सापळा पथक यांना पुढील पडताळणी कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही शासकीय व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये दि.10/10/2025 रोजीचे पडताळणी कारवाई दरम्यान वापरण्यात आलेले मेमरीकार्ड पुढील पडताळणीकरीता सलग वापरण्यात येणार असल्याचे सांगुन त्यामध्ये दि.10/10/2025 रोजीच्या ध्वनिमुद्रीत झालेल्या तीन फाईल व्यतिरिक्त इतर कोणतीही फाईल नसल्याची दोन्ही पंचांची व तक्रारदार यांची खात्री करून दिली. आम्ही व्हॉईस रेकॉर्डर चालू करून 12.24 वाजता चालु करून त्यामध्ये तक्रारदार, पंच क्र.1 श्री.आरु व पंच क्र.2 श्री गाडेकर यांची पडताळणी निवेदन

ध्वनिमुद्रीत केली. त्यानंतर आम्ही दिलेल्या सुचनांची थोडक्यात उजळणी करून आम्ही व्हॉईस रेकॉर्डर चालु केला व तो पोशि तावरे यांचे मदतीने तक्रारदार श्री गज्जे यांनी परिधान केलेल्या शर्टचे आतील बाजूस सेफ्टी पिनचे सहाय्याने लावला व तक्रारदार व पंच क्र.1 श्री.आरू यांना पडताळणी कारवाई करीता कोंढवा पोलीस स्टेशन येथे 12.34 वाजता रवाना केले व आम्ही उर्वरित पथकासह शासकीय वाहनात थांबुन राहिलो.

त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी पडताळीवरून परत आले. पोशि तावरे यांनी तक्रारदार यांचा व्हॉईस रेकॉर्डर काढून आमचेकडे दिला असता तो आम्ही बंद केला ती वेळ 13.37 वाजताची होती. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंच क्र.1 यांना शासकीय वाहनात बसविले. आम्ही पंच क्र.1 श्री आरु यांना पडताळणी दरम्यान घडलेल्या हकिकतबाबत विचारणा केली असता त्यांनी पंच क्र.2 यांचे समक्ष सांगितले की, ते व तक्रारदार असे तक्रारदार यांचे दुचाकी वाहनाने कोंढवा पोलीस स्टेशन येथे गेले असता तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल क्रमांकावरून लोकसेवक यांचे मोबाईल क्रमांकावर फोन करून ते कुठे आहेत याबाबत विचारणा केली असता लोकसेवक यांनी "ये वरती जीथ मी आहे तीथच ये" असे तक्रारदार यांना सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी त्यांचे वाहन पार्क करून ते व तक्रारदार असे लोकसेवक बसत असलेल्या पहिल्या माळयावरील त्यांचे कक्षात गेले. त्यावेळी लोकसेवक त्यांचे खुर्चीवर बसलेले होते. त्यावेळी तक्रारदार श्री गज्जे व लोकसेवक महारनवर यांचेत तक्रारदार यांचे विरुध्द दाखल गुन्हयाचे अनुषंगाने चर्चा झाली. त्या दरम्यान लोकसेवक महारनवर यांनी तक्रारदार यांना त्यांचे व लोकसेवक यांचे ओळखीचे पोलीस खात्यातुन सेवानिवृत्त झालेले पोलीस श्री फरांदे यांना फोन लावण्यास सांगितले असता ते ओरडतील असे सांगुन तक्रारदार यांनी फोन केला नाही. त्यावेळी लोकसेवक महानवर यांनी त्यांचे मोबाईलवरून फरांदे यांना फोन केला परंतु त्यांना उचलला नाही त्यानंतर फरांदे यांनी त्यांचा मोबाईल क्र.8698178271 वरून लोकसेवक यांना 9689524887 त्यांचे या मोबाईल क्रमांकावर फोन केला असता लोकसेवक यांनी कॉल घेवून स्पीकर ऑन करून तक्रारदार यांचेकडे देवून बोलणी करण्यास सांगितले. त्यावेळी श्री फरांदे व तक्रारदार यांचेत पुढील प्रमाणे चर्चा झाली.

त्या दरम्यान श्री फरांदे हॅलो...आण्णा क्या हो गया तक्रारदार हा साहब आया हु इधर बैठा हु इधर फरांदे हो गया की नही काम तक्रारदार साहब बोला की हो गया है असे बोलले असता त्यावर फरांदे उन्हे कुछ तो क्या करना वो बोलके रहेगा..मेरे को कुछ नही बोलणे वाले वो ...तुम एक काम करो ..सेट ने किया तुम्हारे...तुम्हारा जो बी है .. खत्म है..ऐसा करो.. हो जाएगा खतम त्यावर तक्रारदार नही कुछ बोला ही नही साहब ..कुछ नही चाहीये बोला त्यावर फरांदे अरे वो नही बोलणेवाले मै बोल रहा हु ना त्यावर तक्रारदार ठिकेय मै पुछताहे सर त्यावर फरांदे कोर्ट मॅटर वो तो हो जाएगा लेकीन अभी तुमको अटक किया तो दो दिन जेल मे रहेना पडेगा चलेगा त्यावर तक्रारदार नही साहब असे बोलले असता त्यावर फरांदे हा वो बात समझ मे आया क्या...तो मेरे वजीसे उसने उन्हाने सामने वो रुका था... तो आप जोभी है थोडा बहुत करलो हो जाएगा वो सब त्यावर तक्रारदार ठिकय साहब पुछता हू साहब आं त्यावर फरांदे नही पुछो मत डायरेक्ट देदो जो भी है तुम्हारे दिल से जो है... एक ध्यान मे रखो सबसे पहिली बात... मैने बोला है.... वो बोलणे वाले भी नही है जो भी है वो लेंगे... अभी फोन मेरे फोन की वजहसे इतना सहकार्य किया है उन्होने ये नही तो तुमको उस दिन मे अटक करने की थी समझ मे आया क्या त्यावर तक्रारदार ठिकेय साहब त्यावर फरांदे छोड दो बात आगे बात बहुत बडी है... तो दे दो क्या करना है करके तक्रारदार हे ठिकय असे बोलल्यानंतर फोन कट केला. त्यानंतर लोकसेवक महारनवर हे तक्रारदार यांना हंम...काय ऐकल त्यावर तक्रारदार लोकसेवक यांना काय करू सांगा बोलले त्यावर लोकसेवक तक्रारदार यांना तेच सांगायलो मी काहीच बोलत नाही....मी एका शब्दान बोलाय नाही तुला..तुझी तुच बोल अण तुझी तुच कर त्यानंतर तक्रारदार लोकसेवक यांना आता काय आणल नाय साहेब पैसे नाय आणले... थोड वेळ दया हयाच्यात असे बोलून पैशाकरीता वेळ दया असे विनंती करत राहिले त्यानंतर लोकसेवक तक्रारदार यांना बबलुला दयायच त्यावर तक्रारदार लोकसेवक यांना हो.. त्यांनी सुध्दा पाच हजार तुम्हाला दिले ना त्यावर लोकसेवक काय करायच साहेबांनीच....तु दिलेले पैसे मला माघारी दिलेत एवढच सांगायच...लावा फोन त्याला...काय बोललो लक्षात आल का तुमच्या त्यावर तक्रारदार मलाच ते ओरडतोय त्यावर लोकसेवक अहो मी तुम्हाला काय आता हयाच...तुम्ही सांगा बर हयांनला मी काय म्हणतुय (पंचांना उद्देशुन) .....मी तुम्हाला काय म्हणल त्यांनी मला दिल... तीच पैसे म्हणायच मला माघारी दिलेत असे बोलून लोकसेवक महारनवर यांनी यापुर्वी तक्रारदार यांचे घर मालक यांचेकडून पाच हजार रुपये घेतलेल्याचे मान्य करून घर मालकाने लोकसेवक यांना दिलेल्या पैश्याची जनमानसात चर्चा केल्याने लोकसेवक यांनी तक्रारदार यांना पाच हजाराची मागणी करून ते पैसे लोकसेवकाचे वतीने घर मालकास देणेबाबत तक्रारदार यांना तगादा लावला. त्यावेळी तक्रारदार आता पैसे आणले नाहीत असे लोकसेवकास सांगत राहिले परंतु लोकसेवक तस नसतय आता लगेच करा.. गुगल पे ने करा.. मी नाही थांबणार, नाही जमत, मी तुमच ऐकायच..तुम्ही माझ नाही ऐकायच..लय हुशार कामय तुमच राव असे बोलून तक्रारदार यांना पैसे देण्याबाबत तगादा लावू लागले त्यावर तक्रारदार यांनी दोन

तास तरी दया अशी विनंती केली असता लोकसेवक यांनी एक तास सुध्दा नाय ..इथच दयायचे असे बोलून तक्रारदार यांचे आणखी चर्चा केली.

त्यानंतर लोकसेवक महारनवर यांनी तक्रारदार हे बबलु यादव यास लोकसेवक यांचे वतीने पाच हजार रुपये देणार आहेत याबाबतचे खात्री करीता लोकसेवक यांचे समक्ष फोन तक्रारदार यांना करण्याचा आग्रह करू लागले परंतु तक्रारदार तो ओरडेल असे बोलल्याने लोकसेवक महारनवर यांनी त्यांचे मोबा.क्र. 9689524887 वरून बबलु यादव याचा मोबा.क्र. 8668820672 वर फोन लावला बबलु यादवने फोन उचलल्यानंतर बोलणे करण्याकरीता स्पीकर ऑन करून तक्रारदार यांचेकडे दिला असता तक्रारदार घरमालक बबलु यादव यास हॅलो हा सेठ इधर पोलीस स्टेशन मे आया था.. ओ साहब बोल रहा की आपने इधर साहब को पैसा दिया ना, वो मुझे आपको देणेके लिये बोला..मै देताहु आपको त्यावर बबलु यादव रिटर्न देणेको बोल रहा है क्या त्यावर तक्रारदार बबलु यादवला पैसा जो साहबको दिया वो आपको देणेके लिये बोला, अभी तो मेरे पास नही है मै देता हु आपको त्यावर बबलु यादव तक्रारदार यांना जो पाच हजार दिया वो रिर्टन देणे के लिये बोल रहे है...क्यु त्यावर तक्रारदार बबलु यादव ला क्या मालुम कैसे असे बोलले त्यानंतर तक्रारदार व बबलु यादव यांचे थोडी आणखी चर्चा होवून फोन कट झाला. त्यानंतर तक्रारदार व लोकसेवक यांचे आणखी थोडी चर्चा झाली त्यानंतर मी व तक्रारदार असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. अशी हकिकत पंच क्र.1 श्री आरु यांनी सांगितली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना घडलेल्या हकिकतेबाबत विचारणा केली असता त्यांनी पंच क्र.1 यांचेप्रमाणे मिळती जुळती हकिकत सांगितली. आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करून ऐकले असता ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरे असलेबाबतची खात्री केली.

एकंदरीत दि.11/10/2025 रोजीचे झालेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक महारनवर यांनी तक्रारदार यांना त्यांचे विरुध्द दाखल गुन्हयात अटक न करण्यासाठी व मदत करण्यासाठी पंच क्र.1 श्री आरु यांचे समक्ष रुपये पाच हजार लाचेची मागणी केल्याचे व सदर लाच मागणीस तक्रारदार व लोकसेवक यांचे ओळखीचे श्री फरांदे यांनी पंचासमक्ष प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले. तसेच लोकसेवक यांनी यापुर्वीच बबलु यादव यांचेकडून त्याला गुन्हयात अटक न करण्यासाठी व मदत करण्यासाठी रुपये पाच हजार लाचेची रक्कम स्वीकारल्याचे मान्य केले व सदर दिलेल्या रक्कमेबाबत बबलु यादव याने जनमानसात चर्चा केल्याने ती रक्कम बबलु यादव यास लोकसेवक महारनवर यांना परत करायची होती. त्यामुळे लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे मागणी केलेली लाचेची रक्कम रु.5000/- ही लोकसेवक महारनवर यांचे वतीने बबलु यादव यास देण्यासाठी तक्रारदार यांना सांगितल्याचे पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचासमक्ष तक्रारदार यांना पुढील पडताळणी बाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, त्यांना लोकसेवक महारनवर यांचेकडून लाचेची मागणी झाली व त्यांची तक्रार त्यांचे विरुध्दच असल्याने त्यांना इतर कोणाकडेही पडताळणी करीता जाण्याची इच्छा नाही. म्हणून आम्ही तक्रारदार यांना पुढील सापळा कारवाई बाबत विचारले असता त्यांनी त्यांचेकडे लाच रक्कम म्हणुन हजर करावयाची रक्कम त्यांचेकडे नसल्याने तसेच दि.12/10/2025 रोजी त्यांना काम असल्याने दि.13/10/2025 रोजी करण्यात यावी अशी दोन्ही पंचासमक्ष आम्हास विनंती केल्याने दि.11/10/2025 रोजीची कारवाई स्थगित करणेत आली.

त्यानंतर आम्ही दिलेल्या सुचनेवरून दि.13/10/2025 रोजी दोन्ही पंच व सापळा पथक सकाळी 10.30 वाजता आमचे कक्षात हजर झाले. त्यामध्ये शासकीय वाहन एमएच 12 युसी 4105 व त्यावरील चालक पोहवा तावरे यांचे ऐवजी शासकीय वाहन क्र.एमएच 12 युसी 4109 व त्यावरील चालक सपोफौ अविनाश चव्हाण असे देण्यात आले. आमच्या मागणीवरून पोलीस उपअधीक्षक गावडे यांनी श्रीमती आसावरी शेडगे व पोशि कुमकर यांची अतिरिक्त मदत आम्हाला दिली. सदर दिवशी तक्रारदार हे 16.15 वाजता त्यांचेकडील दुचाकी वाहन क्र.एमएच 04 सीवाय 4563 ने आमचे कक्षात हजर झाले व त्यांनी सांगितले की बबलु यादव यांना लोकसेवक महारनवर हे फोन करून वारंवार पोलीस स्टेशन येणेबाबत त्रास देत आहेत त्यामुळे बबलु यादव यांनी तक्रारदार यांना कोंढवा पोलीस ठाणेस बोलाविले आहे. त्यामुळे तक्रारदार कोंढवा पोलीस ठाणेस जाणार असल्याने त्यांनी लोकसेवक महारनवर यांचेविरुध्द पुढील सापळा कारवाईचे नियोजन करण्याची विनंती आम्हास केली. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 असे तक्रारदार यांचे दुचाकी वाहनाने कोंढवा पोलीस स्टेशन येथे जातील असे ठरविण्यात आले. त्याप्रमाणे आम्ही सापळा कारवाईचे नियोजन करून आम्ही दोन्ही पंच साक्षीदार, तक्रारदार व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पडताळणी कारवाई करीता वापरण्यात आलेले मेमरीकार्ड हे पुढील सापळा कारवाईकामी सलग वापण्यात येणार असल्याचे सांगुन आम्ही सदर मेमरीकार्ड व्हॉईस रेकॉर्डरमध्ये घालून त्यामध्ये दि.10/10/2025 रोजीच्या तीन व दि.11/10/2025 रोजीच्या अशा एकुण 05 ध्वनिमुद्रीत फाईल व्यतिरिक्त इतर कोणताही डाटा नसल्याची खात्री करून दिली. आम्ही तक्रारदार श्री.गज्जे व पंच क्र.1 श्री. आरु व पंच क्र.02 श्री. गाडेकर यांचे सापळा निवेदन घेतली ती वेळ 17.12 वा ची होती. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे

बचतीमधील रक्कम रूपये 5,000/- (रूपये 500/- दराच्या 10 चलनी नोटा) अशी रक्कम लाच रक्कम म्हणून आमचे समक्ष हजर केली. सदर नोटांचे नंबर पोशि तावरे यांनी एका को-या कागदावर लिहुन घेतले त्यावर आम्ही व पंचांनी सहया केल्या. त्यानंतर आम्ही आमचे कक्षामध्ये दोन्ही पंचांना व तक्रारदार आरु यांना अन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगितले की सुर्यप्रकाशात किंवा कृत्रिम प्रकाशात एखादया वस्तुला किंवा कपडयाला लागलेली अँथ्रासिन पावडरची चकाकी दिसुन येत नाही. परंतु अंधारामध्ये तिच्यावर अल्ट्राव्हायोलेट दिव्याचा प्रकाश टाकला असता निळसर चकाकी दिसून येते सदरबाबत त्याची प्रात्यक्षिके करून दाखवली. त्यानंतर आमचे सुचनेवरून तक्रारदार यांनी लाच रक्कम म्हणून हजर केलेल्या रु.500/-दराच्या 10 नोटांना चालक सपोफो अविनाश चव्हाण यांनी कापसाच्या बोळयाने क्रमाक्रमाने नोटांच्या दोन्ही बाजूस अॅन्थ्रासीन पावडर लावली व त्यानंतर सपोफौ चव्हाण यांनी सदर लाचेच्या रक्कम तक्रारदार गज्जे यांच्या नेसणीस असलेल्या शेवाळी रंगाच्या फुलबाहयाच्या शर्टचे पुढील समोरील डाव्या खिशात ठेवली. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना सापळा कारवाई यशस्वी झाल्यास लोकसेवकाची "अंगझडती व लाचेची रक्कम " हस्तगत करण्याच्या कारवाईचे चित्रीकरण नवीन सिलबंद मेमरी कार्ड मध्ये करण्यात येणार असल्याचे सांगितले.

लोकसेवक महारनवर यांनी मागणी केलेली लाच रक्कम देणेकरीता तक्रारदार यांना शासकिय व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन त्यांनी परीधान केलेल्या शर्टचे आतील बनयिनला पोशि तावरे यांचे मदतीने सेफटीच्या सहाय्याने लावुन देऊन तक्रारदार यांना पंच क्र.1 श्री. आरु यांचेसह तक्रारदार यांचेकडील नमुद दुचाकीने कोंढवा पोलीस चौकी येथे जाणेसाठी 17.33 वा चे सुमारास रवाना केले. त्यांचे आम्ही व उर्वरित सापळा पथक शासकीय वाहनाने रवाना झालो. कोंढवा पोलीस स्टेशचे पुर्वी काही अंतरावर शासकिय वाहन कोणास संशय येणार नाही अशा प्रकारे थांबवले आम्ही सर्वजण वाहनातुन उतरून पायी चालत जावून कोंढवा पोलीस स्टेशनचे आजुबाजुचे परिसरामध्ये विखरुन थांबलो त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 असे तक्रारदार यांचेकडील दुचाकी वाहनाने कोंढवा पोलीस स्टेशनचे गेटवर येवून त्यांचे वाहन पार्क करून दोघेही चालत कोंढवा पोलीस स्टेशनचे मुख्य गेट आतील परिसरात गेले येथे गेले व पोलीस ठाणे समोरील मोकळया जागेमध्ये ते एका गणवेशधारी पोलीसाशी व त्यांचेसोबत हजर असलेला एक गोल गळयाचा फिक्कट परपल रंगाचा हाफ टिशर्ट व राखाडी रंगाची पॅन्ट असा साध्या वेशातील एका इसमासोबत बोलू लागले. सदर वेळी पंच क्र.02 गाडेकर व आम्ही व पोनि शेडगे तसेच सापळा पथकातील पोशि कुमकर व सपोफौ बाटे असे कोणासही संशय येणार नाही अशा रितीने पोलीस स्टेशनच्या सदर मोकळया जागेत ऐकमेकांना दिसतील अशा पध्दतीने थांबले होते. पोशि तावरे हे मुख्य गेटच्या अगोदर पार्किंग केलेल्या वाहनाचे रांगामध्ये उभ राहिले होते.

त्यावेळी तक्रारदार हे गणवेशधारी पोलीस व सदर इसमाशी बोलत होते व पंच क्र.1 त्यांचे बाजुला उभा राहून बोलणे ऐकत होते. काही वेळ बोलल्या नंतर तक्रारदार, पंच व सदर गणवेशधारी पोलीस व त्यांचेसोबत असलेला इसम कोंढवा पोलीस ठाणेच्या मुख्य गेटमधून बाहेर जावून पोशि तावरे उभे राहिलेल्या ठिकाणापासून काही अंतरावर उभे राहिले. त्यामुळे पोलीस ठाणे आवारात विखरुन राहिलेले सापळा पथक हळुहळु त्यांचे मागोमाग येवू लागले. थोडया वेळाने तक्रारदार गज्जे यांनी त्यांचे डोळयावर परिधान केलेला चष्मा काढून तो डोक्यावर लावून लाच स्वीकारलेबाबत पुर्वनियोजित इशारा केला असता आम्ही व पोशि तावरे यांनी तक्रारदार यांचे जवळ जावून त्या ठिकाणी उभे असलेल्या पंच क्र.1 श्री आरु यांना लाच रक्कम कोणी स्वीकारली याबाबत विचारणा केली असता पंच क्र.01 सदर गणवेशधारी व त्यांचे सोबत असलेल्या इसमाकडे बोट दाखवून हेच ते पोलीस महारनवर व सदर व्यक्ती ही तक्रारदार यांचा घरमालक श्री बबलु यादव असून पोलीस महारनवर यांनी सांगितल्याप्रमाणे बबलु यादव यांनी तक्रारदार यांचेकडील लाचेची रक्कम स्वीकारून परिधान केलेल्या पॅन्टचे मागील बाजुच्या डाव्या खिशात ठेवल्याचे सांगितले. लागलीच पोशि तावरे यांनी सदर गणवेश धारी इसमाचे हात पकडले व आम्ही त्यांचे सोबत असलेल्या इमसाचे दोन्ही हात पकडले. त्यानंतर आमचे सुचनेवरून पोशि कुमकर यांनी त्यांचेकडील शासकीय व्हीडीओ रेकॉर्डरने व्हीडीओ शुटींग चालू केले. सदर दोघांनाही रोडचे लगत पार्किंगमधील वाहनाचे एका बाजुस घेवून आम्ही दोन्ही इसमांना आमची ओळख करून देवून त्यांचे विरुध्द झालेल्या सापळा कारवाईबाबत माहिती दिली. त्यावेळी आम्ही बबलु यादव यास लाच रकमेबाबत विचारणा करता त्यांनी त्यांचे परिधान केलेल्या पॅन्टचे पाठीमागील डाव्या बाजुस असलेल्या खिशातील रक्कम काढून आमचे समक्ष हजर केली असता आमचे सुचनेवरून पंच क्र.2 यांनी ती ताब्यात घेतली व त्यांनी पंच क्र.1 यांचे मदतीने सदर नोटांचे नंबर पंच क्र.1 यांचेकडील सापळापुर्व कारवाई दरम्यान नोंटाचे नंबर लिहलेल्या कागदावरील नंबरशी पडताळून पाहिले असता ते तंतोतंत जुळून आले. त्यानंतर सदर ठिकाणी सोबत आलेल्या काळया कपडयाचे सहाय्याने कृत्रीम अंधार करून त्यामध्ये बबलु यादव यांचेकडुन हस्तगत केलेली लाच रक्कम व त्यांचे दोन्ही हात तसेच त्यांनी परीधान केलेल्या राखाडी रंगाच्या पँट चे मागील बाजुच्या डाव्या बाजुस असणा-या खिशाचे अल्ट्रा व्हायलेट दिव्याच्या प्रकाशामध्ये दोन्ही पंचासमक्ष तपासणी

केली असता बबलु यादव यांचे दोन्ही हातास पुढील बाजुस, बोटांच्या पे-यावर, लाच रकमेवर तसेच परीधान केलेल्या पँटचे मागील बाजुच्या डाव्या खिशाचे अग्रभागी व आतमध्ये अन्थ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर आम्ही, पंच व सापळा पथकाने आमचे हाताची व कपडयांची अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशामध्ये तपासणी केली असता पंच क्र.2 यांचे हाताचे बोटांचे पे-या व्यतिरिक्त इतर कोणाचेही हात अगर कपडयांवर अँथ्रासिन पावडरची चकाकी दिसून आली नाही. त्यानंतर आम्ही बाजुला थांबलेले तक्रारदार श्री गज्जे यांना सदर ठिकाणी बोलावून त्यांचे हात व कपडयाची अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशामध्ये तपासणी केली असता त्यांचे उजव्या हाताची बोटे व पे-यांना तसेच परिधान केलेल्या शर्टचे समोरील बाजुस असलेल्या डाव्या खिशाचे अग्रभागी व आतमध्ये अँथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसून आली. सदर वेळी व्हीडीओ चित्रीकरण करण्यात आलेले आहे. त्यानंतर आम्ही लोकसेवक महारनवर यांना कोंढवा पोलीस स्टेशनमध्ये ते बसत असलेल्या त्यांचे कक्षात घेवून त्यामधून तक्रारदार व बबलु यादव यांचे विरुध्द दाखल असलेल्या गुन्हयाची कागदपत्रे हस्तगत करण्यात आलेले आहेत. त्यानंतर तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर पोशि तावरे यांनी काढून तो आमचेकडे दिला असता आम्ही तो बंद करून आमचे ताब्यात ठेवला ती वेळ 18.50 वाजता ची होती. उपरोक्तबाबत त्यात्या दिवशी सविस्तर पंचनामे करण्यात आलेले आहेत.

तरी दि.10/10/2025 रोजी तक्रारदार श्री गज्जे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.10/10/2025 रोजीचे 17.45 ते दि.11/10/2025 रोजी व दि.13/10/2025 रोजीचे 18.50 वाजता दरम्यान कोंढवा पोलीस ठाणे येथे पंचासमक्ष केलेल्या पडताळणी, सापळापुर्व व सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार श्री. रविंद्र रामलु गज्जे, वय 44 वर्षे, व्यवसाय – कारपेंटर, रा. सध्या ड/द श्री. बबलु सुखदेव यादव, बुध्द विहाराजवळ, साईनगर, सुखसागर रोड, कोंढवा पुणे मो.क्र.9372440445 मुळ गाव :- सिरसीनगन्ना, ता.जि. सिध्दपेठ, राज्य – तेलंगणा यांचे व त्यांचा घर मालक बबलु सुखेदव यादव यांचे विरुध्द कोंढवा पोलीस ठाणे येथे गु.र.नं. 644/2025 वीज नियामक कायदा कलम 135 अन्वये दाखल गुन्हयात त्यांना अटक न करण्यासाठी व गुन्हयात मदत करण्यासाठी यातील लोकसेवक श्री.सोमनाथ बापु महारनवर वय 36 वर्षे व्यवसाय - शासकीय नोकरी पद- पोलीस शिपाई ब.नं. 8352 नेमणुक – कोंढवा पोलीस स्टेशन, पुणे शहर यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडे रु.5000/- लाचेची मागणी ती बबलु यादव यांचे मार्फतीने स्वीकारली तसेच आलोसे यांचे घराचे किरकोळ काम करून देण्याबाबत तक्रारदार यांचेकडे मागणी केली आहे. तसेच लोकसेवक श्री महारनवर यांचे लाच मागणीस श्री युवराज कृष्णा फरांदे वय 59 वर्षे व्यवसाय- सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक रा.स्वप्नपुर्ती बंगला वृदावन सोसायटी, उरुळी देवाची ता. हवेली जि. पुणे यांनी प्रोत्साहन दिले म्हणुन माझी कोंढवा पोलीस ठाणेचे पोलीस शिपाई सोमनाथ बापु महारनवर व सेवा निवृत्त पोलीस उपनिरीक्षक युवराज कृष्णा फरांदे यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7, 12 प्रमाणे कायदेशिर फिर्याद असून कारवाई होणेस विनंती आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणे प्रमाणे मराठीत टंकलिखीत केला असून तो बरोबर व खरा आहे.

हा फिर्यादी जबाब दिला....

समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

ravindra ashok gawade

**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Bhalani MC7671
ठाणे अंमलदार
कोंढवा पोलीस ठाणे, पुणे

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): VINAY GULABRAO P
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.** (जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)